# ‘हॅकाथॉन’ विद्यार्थ्यांसाठी रोजगारांच्या संधी निर्माण करील

## मुख्य सचिव पुनीतकुमार गोएल यांचे प्रतिपादन, फर्मागुडी येथे नॉनस्टॉप ४८ तासाच्या ‘हॅकाथॉन’ कोडींगचा समारोप

**प्रतिनिधी**
**फोंडा**

मेनफ्रेम कॉम्प्युटर ते डेस्कटॉप कॉम्प्युटर अशा दशकभरात बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी स्वत:ला अपडेट करीत रहावे. आजच्या विद्यार्थ्यांनी भविष्यातून यशस्वी 'टेकीज' म्हणून ओळख निर्माण करताना नाविन्याची साथ सोडू नये. खासगी क्षेत्रातही नैतिक हॅकार्थॉनला येत्या काळात भयंकर मागणी वाढणार असून हॅकार्थॉन उपक्रमातूक घेतलेल्या ज्ञानाचा विद्यार्थ्यांनी सदुपयोग केल्यास रोजगाराची अनेक दारे खुली होणार असल्याचे प्रतिपादन मुख्य सचिव पुनीतकुमार गोएल यांनी केले.



**फर्मागुडी : हॅकार्थॉन उपक्रमातील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक प्रदान करताना मुख्य सचिव पुनीतकुमार गोयल. बाजूला मिसाईल महिला डॉ. टेसी थॉमस पोलीस महासंचालक जसपाल सिंग, प्रा. बी के मिश्रा, प्रा. आर बी लोहानी.**

फर्मागुडी–फोंडा येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यायलाच्या संकुलात शनिवार १० सप्टेबर मध्यरात्रीपासून सुरू झालेल्या नॉनस्टॉप ४८ तासांच्या 'हॅकार्थॉन' या महाविद्यालयीन विद्यार्थी व गोवा पोलीस फ्रेन्डली उपक्रमाच्या काल सोमवारी झालेल्या समारोपप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी त्याच्यासमवेत भारताची मिसाईल वुमन म्हणून परिचित डॉ. टेसी थॉमस, गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य राजेश बी. लोहानी, आयआयटीचे संचालक प्रा. बी. के. मिश्रा उपस्थित होते. तसेच पोलीस महानिरीक्षक ओमवीर सिंग, पोलीस अधिक्षक अभिषेक धानीया, सायबर क्राईम अधिक्षक निधीन वालसन उपस्थित होते. गोवा पोलिसांकडून पहिल्यांदाच आयोजित केलेल्या हॅकार्थॉन उपक्रमात राज्यातील दहा नामांकित महाविद्यालयातील ५३ विद्यार्थ्यांनी नॉनस्टॉप ४८ तास संगणकावर कोडींग करीत गोवा पोलिसांनी दिलेल्या सात विषयावर आपल्या तांत्रिक बुद्धिमत्ता वापरून सायबर गुन्ह्यावर महत्त्वाचे टिपसूसह उपाय सुचविले. त्यानंतर गोवा पोलीस टीमसमोर परीक्षकांच्या उपस्थित केलेल्या सूचनांवरही समर्पक उत्तरे दिली. गोवा पोलिसांनी आयआयटी गोवा, बिटस् पिलानी गोवा व गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाशी या उपक्रमात सामंजस्य करार करण्यात आल्याची माहिती दिली.

### विद्यार्थ्यांनी संशोधक वृत्ती सोडू नये : डॉ. टेसी थॉमस

मिसाईल वुमन डॉ. टेसी थॉमस यांनी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविताना महत्त्वाचे बाळकडू पाजले. विद्यार्थ्यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानाची सांगड घालीत संशोधक वृत्ती जोपासावी, फळाची अपेक्षा न करता कर्म करीत रहावे कारण अपघातानेच अनेक संधोशने नोंद झाल्याची माहिती त्यानी दिली. अग्नी–४ क्षेपणास्त्र प्रकल्पाच्या वैज्ञानिक व भारतीय संरक्षक दलात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या डॉ. टेसी थॉमसकडून विद्यार्थ्यांनी सायबर गुन्हे व संरक्षक दलातील विषयावर माहिती घेतली.

### बिटस् पिलानी टिम ठरली अव्वल ‘हॅकार्थॉन’ टेकीज हॉक्स

**हॅकार्थॉन उपक्रमांतर्गत सायबर गुन्ह्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी नाविन्यपूर्णरित्या चित्रफितीद्वारे सादरीकरण केलेल्या बिटस् पिलानी गोवा टिमच्या बिटस् अॅन्ड पिसीस टिमला रू. २५ हजाराचे रोख पारितोषिक व प्रशस्तीपत्रक मुख्य सचिव गोएल यांनी प्रदान केले. द्वितीय आयआयटी गोवा यांना रू. १५ हजार व प्रशस्तीपत्रक तर तृतीय स्थानी गोवा अभियांत्रिकी महाविद्यालय यांना रू. १० हजार व प्रशस्तीपत्रक देण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक अधिक्षक निधीन वालसन यांनी केले. सूत्रसंचालन महिला पोलीस निरीक्षक रिमा नाईक यांनी केले.**